# प्रशासकीय ठराव
## लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**ठराव क्रं.** 213 **दि.** 02 / 08 / 2024

**विषय -** केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना (दुसरी वेळ) राबविणेच्या कामाच्या निविदा दर मंजुरी बाबत.

**संदर्भ -**
1. ई-निविदा मागवलेला दि. 15.03.2024 ते 01.04.2024
2. ई-निविदा उघडणेचा दि. 02.04.2024
3. कंत्राटदार यांना वाटाघाटी करिता देण्यात आलेले पत्र दिनांक 18.04.2024
4. कंत्राटदार यांचे निविदा दर वाटाघाटी अंती कमी केलेले पत्र दिनांक 19.04.2024
5. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांना दर निश्चिती पडताळणी करणे बाबत पत्र दि. 23.04.2024
6. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांचे दर निश्चिती पडताळणी केले बाबत पत्र दि. 30.04.2024
7. मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव दिनांक 08.05.2024
8. मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक 18 जुन 2024 च्या बैठकीचे इतिवृत्त.
9. कंत्राटदार यांचे कमी केलेले निविदा दरा बाबत पत्र दिनांक 13.06.2024
10. मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना दर मंजुरी बाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव दिनांक 14.06.2024
11. मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक 21 जुन 2024 च्या बैठकीचे इतिवृत्त.
12. स्वःहिस्सा उभारणीबाबतचा प्रशासकीय ठराव क्रं. 199 दिनांक 24.06.2024
13. मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधामधील मनपा स्वःहिश्श्याचा निधी उभारणी बाबत पत्र दि. 25.06.2024
14. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि., पुणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचेपत्र दि. 02.07.2024
15. मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक 16 जुलै 2024 च्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्ताव -**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना (दुसरी वेळ) राबविणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 09/2023-24 Tender ID 2024_LMC_1035520_1 मागविण्यात आले होते.

प्रस्तावित निविदेस एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आलेनुसार संदर्भ क्रं. 2 अन्वये निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. यामध्ये 1) आर अ‍ॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट), मुंबई 2) भुरलम कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि., आर.पी. रोड, सिकंद्राबाद 3) जयदिपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नरिमन पॉईंट, मुंबई असे एकुण तीन निविदाधारक प्राप्त झाले. सदर निविदा धारकाचे कागदपत्रांची तपासणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता उपरोक्त निविदाधारकापैकी जयदिपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नरिमन पॉईंट, मुंबई हे अपात्र ठरले आहेत. उर्वरीत दोन निविदाधारक आर अ‍ॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई व भुरलम कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि., आर.पी. रोड, सिकंद्राबाद हे पात्र ठरल्याने दोन्ही पात्र निविदा धारकांचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. पात्र निविदा धारकांचा दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अनु क्रं. | निविदाधारकाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | प्राप्त दर |
|---|---|---|---|
| 1. | आर अ‍ॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई | 217,82,79,400/- | 9.990% अधिक म्हणजेच रक्कम रु. 239,58,89,512.06/- |
| 2. | भुरलम कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि., आर.पी. रोड, सिकंद्राबाद | | 20.430% अधिक म्हणजेच रक्कम रु. 262,33,01,881.42/- |

प्राप्त दोन निविदा धारकाचे दरापैकी सर्वात कमीचे दर आर अ‍ॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई यांचे असल्याने संदर्भ क्रं. 3 अन्वये अंदाजपत्रक दराने काम करणेकरीता वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले असता संदर्भ क्रं. 4 अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. 217,82,79,400/- पेक्षा 9.75% अधिकने काम करण्यास समर्थता दर्शविली. संदर्भ क्रं. 5 अन्वये सदर दर निश्चिती करावे किंवा कसे यासंबंधी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छत्रपती संभाजी नगर यांना स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याकरिता कळविण्यात आले असता संदर्भ क्रं. 6 अन्वये मजीप्रा, छत्रपती संभाजी नगर यांनी निविदेतील दर हे सन 2023-24 दरसुचीनुसार असुन अद्यावत आहेत तरी कंत्राटदाराने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने बाजार भावाप्रमाणे दराबाबत कार्यवाही करणे बाबत कळविले. संदर्भ क्रं. 7 अन्वये मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना 9.75% अधिकचे दर निविदा मंजुरी बाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव पाठविण्यात

आला. परंतू संदर्भ क्रं. 8 अन्वये मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीमध्ये लातूर शहर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन जास्तीचा वाढीव निधी उभारणी बाबत आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी खातरजमा करावी व तसेच फेरवाटाघाटी करुन राज्यस्तरीय तांत्रिक समिती समोर नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले. राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार संदर्भ क्रं. 9 अन्वये कंत्राटदार यांनी अंदाजपत्रक दरापेक्षा 8.80% जास्तीने काम करण्यास समर्थता दर्शविली. संदर्भ क्रं. 10 अन्वये मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना लातूर शहर अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा योजनेची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा +8.80% दराने निविदा मंजुरी बाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव पाठविण्यात आला. संदर्भ क्रं. 11 मा. प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत समितीने लातूर महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती व महानगरपालिकेस अमृत 2.0 व नगरोत्थान योजनेअंतर्गत यापुर्वी मंजूर असलेल्या प्रकल्पांकरीता स्वहिश्यापोटी मोठा निधी उभारावा लागणार आहे. या प्रकल्पाकरीता देखील प्रकल्पातील स्वहिश्यापोटी आवश्यक निधी व मुळ निवीदा किंमतीपेक्षा जादा दराने निविदा आल्यामुळे स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणे लातूर महानगरपालिकेस क्रमप्राप्त ठरत आहे. एकंदरीत स्वहिश्यासाठी आवश्यक संपुर्ण निधी उभारण्याची लातूर महानगरपालिकेची जबाबदारी राहिल व त्यासाठीचा आवश्यक ठराव व तरतुद लातूर महानगरपालिकेने समितीसमोर सादर करावा तसेच कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाला Finacial Closure शिवाय कार्यादेश (Work Order) देऊ नये. अशी समितीने शिफारस केली. संदर्भ क्रं. 12 च्या प्रशासकीय ठराव क्रं. 199 दिनांक 24.06.2024 अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अंतर्गत पाणी पुरवठा प्रकल्पाकरीता प्रकल्पातील स्वहिश्यापोटी आवश्यक निधीची रक्कम उभारणी करणे व तसेच राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मुळ निविदा किंमतीपेक्षा जादा दराने निविदा मंजुर केल्यास स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणे महानगरपालिकेस क्रमप्राप्त आहे. त्यासाठी महानगरपालिकेने 15 वा / 16 वा वित्त आयोग अनुदानातुन स्वहिःस्सा पोटी निधी चिन्हांकित करुन ठेवावा, मालमत्ता व इतर करापोटी वसुल होणा-या रक्कमेतून निधीची तरतुद व तसेच मनपा फंड, म्युनिसिपल बॉन्ड, मुन्फ्रा लोन, कर्ज व इतर पर्यायी स्त्रोतांचा अवलंब करुन स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणी करणे करिता मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्रं. 13 अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा योजनेचा मनपा स्वःहिश्श्याचा निधी उभारणीबाबत ठराव व तरतुदीबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी बाजारभावाबाबत अधिकची चौकशी केली असता DI Pipe चे दरामध्ये अंदाजपत्रक दर व बाजारभावच्या दरामध्ये खुप तफावत असुन आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली यांनी सादर केलेले अंदाजपत्रक दरापेक्षा 8.80 % जास्तीचे दर समर्थनिय असुन सदर कामामध्ये प्रमुख काम हे DI Pipe चा पुरवठा हे आहे भविष्यात आणखिन दरामध्ये वाढ झाल्यास त्याचा अतिरीक्त आर्थीक बोजा महापालिकेवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी संदर्भ क्रं. 14 अन्वये शिफारस केली आहे. संदर्भ क्रं. 15 मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीचे इतिवृत्त अन्वये समितीने मंजुर प्रकल्प किंमतीपेक्षा अधिकची रक्कम उभारण्याची जबाबदारी लातूर महानगरपालिकेची राहील. त्यासाठीचा आवश्यक ठराव व तरतूद लातूर महानगरपालिकेने करणे आवश्यक राहील असे नमुद केले त्यास आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी सहमती दर्शविली म्हणुन समितीने सदर प्रकल्पाचे कार्यादेश देण्यास समितीने मान्यता दिली. सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेले पाणी आरक्षण मंजुरी जलसंपदा विभागाकडुन सक्षम पातळीवर प्राप्त झाल्याची खातरजमा करुन, आवश्यक परवानग्या घेऊन व प्रकल्पातील उपांगाच्या जागा महानगरपालिकेच्या नावावर व ताब्यात असल्याची खातरजमा करुन तसेच सदर प्रकल्पासाठी आवश्यक स्वहिःश्श्याच्या निधीची तरततुद करुन आयुक्त, लातूर महानगरपालिक यांनी संबंधित कामाचे कार्यादेश निर्गमित करावे असे समितीने सुचित केले. निविदा प्रक्रियेनुसार पात्र कंत्राटदारास कार्यादेश देण्याच्या अनुषंगाने व प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण करण्यासाठी विहीत कार्यपध्दतीनुसार आवश्यक कार्यवाही करावी तसेच, प्रकल्पासाठी स्वहिःश्श्याची आवश्यक तरतुद, आवश्यक जागा, विविध विभागांच्या आवश्यक परवानग्या व प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक इतर तांत्रिक बाबींची पुर्तता करुन आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी कायदिश निर्गमित करावा.

तरी आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई यांचे सर्वात कमीचे +8.80% जास्तीने म्हणजे रु. 2369967987.20/- दर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

**निर्णय :-** राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मंजुर केलेल्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना राबविणेसाठीच्या कामास अंदाजपत्रक दरापेक्षा +8.80% जास्तीने म्हणजे रु. 2369967987/- दरास मान्यता देऊन कार्यादेश देण्याकरिता मान्यता दिली आहे व तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी दर मंजुरी बाबत शिफारस केल्यानुसार मे. आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई यांचे सर्वात कमीचे +8.80% जास्तीने म्हणजे रु. 2369967987/- दरास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. वरील कामाचे कायदिश तात्काळ देऊन कामे कालावधीत पुर्ण करुन घेण्यात यावी.

**नगर सचिव**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**प्रशासक**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर